# जाहीरात

केंद्र शासन पुरस्कृत महिला शक्ती केंद्र ही योजना शासनाने, जळगाव जिल्ह्यात अंमलबजावणी करणे करीता शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१९/प्र.क्र.७५/का–१०, दि. २९ जानेवारी २०१९ व शुध्दीपत्रक दि. २९/१२/२०२० नुसार निर्णय घेतलेला आहे.

सदर केंद्राच्या प्रभावी अंमलबजावणी करणे करीता मनुष्यबळ नियुक्त करण्यात येणार आहे. त्या करीता मा. आयुक्तलयाचे पत्र क्र. ३१७३, दि. २५/०९/२०२० च्या पत्रान्वये Online अर्जछाननी करणे करीता व अंतीम निवड करणे करीता मा. जिल्हाधिकारी सो. जळगाव यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय निवड समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकारी व सदस्य यांचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, जळगाव | अध्यक्ष |
| २ | महिला प्रश्न विषयक कार्यरत नागरी समाज संघटनेचे प्रतिनिधी | ०२ सदस्य |
| ३ | महिला प्रश्न विषयक कार्यरत अशासकीय संघटनांचे प्रतिनिधी (ngodarpan.gov.in या NGO पोर्टलवर नोंदणीकृत अशासकीय संघटनेचे प्रतिनिधी) | ०३ सदस्य |
| ४ | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जळगाव | सदस्य सचिव |

अनुक्रमांक २ व ३ मधील सदस्यांची निवड करण्याकरीता जाहीरात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर सदस्यांसाठी आवश्यक जाहीरात, अटीशर्ती व अर्जाचा नमुना jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी अधिक माहितीसाठी सदर संकेतस्थळाला भेट देणे व mahilashaktikendra.jalgaon@gmail.com या मेल आयडीवर ऑनलाईन अर्ज दि. २३/०३/२०२१ वेळ ९:४५ सकाळी ते दि. ३१/०३/२०२१ सायंकाळी ६:१५ पर्यंत सादर करावा.

उक्त प्रमाणे निश्चित केलेल्या वेळ व दिनांकानंतर येणा–या ऑनलाईन अर्जाचा विचार करता येणार नाही. जाहीरातीविषयी अधिक माहितीसाठी कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२५७–२२२८८२८ येथे संपर्क साधावा.

(विजयसिंग परदेशी)
सदस्य सचिव, जिल्हास्तरीय निवड समिती तथा,
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
जळगाव

(अभिजित राऊत)
अध्यक्ष, जिल्हास्तरीय निवड समिती तथा,
जिल्हाधिकारी, जळगाव.

# महिला शक्ती केंद्राच्या सदस्य पदाकरीता अटी व शर्ती

१. संस्था प्रतिनिधींचे नाव व संस्थेचे नाव व पत्ता, मेल आयडी मोबाईल क्रमांक.
२. सदर उमेदवार जळगाव जिल्हयातील स्थानिक रहिवासी असणे आवश्यक आहे.
३. संस्था जळगाव जिल्हयातील नोंदणीकृत पत्ता असलेली असावी.
४. संस्था घटना नियमावलीमध्ये महिलांच्या क्षेत्रातील कार्याबाबत उल्लेख असणे आवश्यक आहे, तसेच घटना नियमावली सादर करावी लागेल.
५. संस्था प्रतिनिधी व संस्था यांचे आधारकार्ड/पॅन कार्ड सादर करणे आवश्यक आहे.
६. संस्थेने मागील तीन वर्षाचे Audit Report (2017-18, 2018-19 & 2019-20) सादर करावे लागेल.
७. महिलांच्या क्षेत्रात ३ वर्ष कार्यरत असल्याबाबत ३ वर्षाचा वार्षिक अहवाल सादर करावा लागेल.
८. संस्थेस महिलांच्या क्षेत्रात कार्य करणेबाबत ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
९. संस्थेच्या प्रतिनिधींची शैक्षणिक पात्रतेची माहिती सादर करावी लागेल.
१०. संस्थेवर तसेच संस्था प्रतिनिधीवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंद नसावा तसेच घोषणापत्र सादर करावे लागेल. संस्थेवर व संस्था प्रतिनिधी निवडीनंतर पोलिस विभागाकडून चरित्र पडताळणी प्रमाणपत्र घेण्यात येईल. त्यात गुन्हा नोंद आढळल्यास नियुक्ती रदद करण्यात येईल.
११. संस्था शासनाद्वारे काळया यादीत समावेश नसल्याबाबत स्वयं घोषणापत्र सादर करावे लागेल.
१२. संस्थेंची दर्पण पोर्टलवर नोंदणी असणे आवश्यक राहील व त्याचे प्रमाणपत्र व क्रमांक उपलब्ध करुन दयावे लागेल.
१३. अर्जदार ज्या संस्थेशी निगडीत आहे त्या संस्थेंची नियमानुसार नोंदणी असणे आवश्यक राहील नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल.
१४. संस्था प्रतिनिधी संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा सदस्य असणे आवश्यक आहे तसेच सदर पदा करीता कार्यकारी मंडळाची मान्यता आहे असा ठराव अर्जा सोबत सादर करावा लागेल.
१५. अटीशर्तीनुसार निश्चित केलेल्या कागदपत्रांची पुर्तता करणा–या प्रतिनिधीस संवादासाठी बोलावण्यात येईल व संवादासाठी १० गुण देण्यात येतील व त्यानुसार निवड करण्यात येईल.
१६. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत १०० रु. स्टॅम्प पेपरवर हमीपत्र दयावे लागेल.
१७. सदस्यास शासनाच्या दिशा निर्देशानुसार कार्य करावे लागेल.
१८. सदस्यांच्या निवडीबाबतचे अंतीम अधिकार मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे राहातील.
१९. सादर केलेल्या माहितीमध्ये काही खोटेपणा आढळल्यास सदर संस्थेस शासनाच्या काळया यादीत टाकण्यात येईल व संस्था प्रतिनिधीवर व संस्थेवर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येईल.
२०. अ) महिला प्रश्न विषयक कार्यरत नागरी समान संघटनेचे प्रतिनिधी किंवा ब) महिला प्रश्न विषयक कार्यरत अशासकीय संघटनेचे प्रतिनिधी म्हणून अर्ज करीत आहात त्यांचा स्पष्ट उल्लेख अर्जात असणे आवश्यक आहे.**(एका संस्थेचा एका प्रतिनिधीस एकाच पदासाठी अर्ज करता येईल त्या संस्थेच्या इतर प्रतिनिधीने अर्ज केल्यास दोन्ही अर्ज अपात्र करण्यात येतील.)**

(विजयसिंग परदेशी)
सदस्य सचिव, जिल्हास्तरीय निवड समिती तथा,
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
जळगाव

(अभिजित राऊत)
अध्यक्ष, जिल्हास्तरीय निवड समिती तथा
जिल्हाधिकारी, जळगाव.

# अर्जाचा नमुना

पासपोर्ट फोटो

मा. जिल्हाधिकारी सो.,
जळगाव.

**विषय–** महिला शक्ती केंद्र जिल्हास्तरीय समिती करीता सदस्य म्हणुन अर्ज करणे बाबत..

**संदर्भ–** दि. / /२०२१ रोजीची प्रसिध्द जाहीरात/ jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द जाहीरात.

महोदय,

वरील संदर्भिय विषयान्वये सविनय सादर करतो/करते की, मी.-----------------------------------

उक्त समितीमध्ये **अ)** महिला प्रश्न विषयक कार्यरत नागरी समाज संघटनेचे प्रतिनिधी **ब)** महिला प्रश्न विषयक कार्यरत अशासकीय संघटनेचे प्रतिनिधी (लागु नसेल ते खोडावे) म्हणून निवड होणे करीता अर्ज करीत असून माझी खालीलप्रमाणे शैक्षणिक व इतर माहिती सादर करीत आहे.

१. पुर्ण नाव (आडनाव प्रथम) श्रीमती/कुमारी/सौ./श्री.---------------------------------------------------------------

२. सध्याच्या पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता .---------------------------------------------------------------

३. कायमस्वरुपी रहिवास पत्ता ---------------------------------------------------------------

४. ई–मेल---------------------------------------------------------------

५. संपर्क क्रमांक ---------------------------------------------------------------

६. शैक्षणिक अर्हता सर्व कागदपत्राचे सांक्षांकीत प्रती/स्वयंसांक्षाकीत प्रती जोडाव्यात-

| अ. क्र. | शैक्षणिक पात्रता | बोर्डाचे/विदयापिठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

७. संस्थेचे नाव, पत्ता, मेल आयडी, मो.नं.---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

८. संस्थेवर व प्रतिनिधीवर गुन्हा/न्यायालयीन प्रकरण/शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावीत आहे काय? होय/नाही

९. ०३ वर्षाचा अनुभव आहे काय? असल्यास (प्रमाणपत्र/आदेश जोडावेत) होय/नाही

१०. संस्था जळगाव जिल्हयातील नोंदणीकृत पत्ता असलेली आहे काय? होय/नाही

११. मागील ०३ वर्षाचे ऑडीट रिपोर्ट जोडलेले आहेत काय? होय/नाही

१२. संस्था ही दर्पण पोर्टलवर नोंदणीकृत आहे काय ? होय/नाही

१३. संस्थेची नियमावली सोबत जोडण्यात आली आहे काय ? होय/नाही

१४. अर्जा सोबत जोडण्यात आलेली कागदपत्र/प्रमाणपत्रे (जाहीरात व अटीशर्तीनुसार)

1. --------------------------------------------------
2. --------------------------------------------------
3. --------------------------------------------------
4. --------------------------------------------------
5. --------------------------------------------------
6- --------------------------------------------------
7---------------------------------------------------
9- --------------------------------------------------
10--------------------------------------------------
11--------------------------------------------------
12--------------------------------------------------
13--------------------------------------------------
14--------------------------------------------------
15--------------------------------------------------

तरी सदर पदासाठी निश्चित केलेल्या सर्व अटीशर्ती मला मान्य असुन माझा अर्ज स्विकृत होणेस विनंती.

ठिकाण—

दिनांक—

**उमेदवाराचे नाव , स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का**